## सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानचा तृतीय वर्धापनदिन विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय व मानसिक मार्गदर्शनाने संपन्न

गेल्या दोन वर्षांपासून लातूरकरांसाठी सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानचा वर्धापन दिन मातीतल्या कलाकरांच्या आविष्काराची वैशिष्ट्यपूर्ण मेजवानी देत राहिला आहे. पहिल्या वर्धापन दिनी 'गावकथा' या नाटकाचा, तर दुसऱ्या वर्धापन दिनी जुन्या हिंदी गाण्यांचा सुश्राव्य कार्यक्रम 'मैफल सुरीली, चंदेरी' व ग्रामीण भागातील शिक्षकांचे सत्कार झाले. मात्र यावर्षी कोरोनाच्या मर्यादांमुळे असा जाहीर कार्यक्रम होवू शकला नाही, तरी सामाजिक जाणिवांच्या बांधिलकीचा वसा जपत, प्रतिष्ठानने प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले.

ग्रामीण भागात महिलांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. विद्यार्थिनींच्या बाबतीत विशेषत: किशोरवयीन विद्यार्थिनींच्या समस्या संकोच, निष्णात मार्गदर्शनाचा अभाव, अजाणता, भीती यांमुळे अजून गंभीर होतात. त्यांचे शिक्षण व अभ्यास यांवरही त्याचा परिणाम होतो. या जाणिवेतून तृतीय वर्धापन दिनानिमित्त प्रतिष्ठानच्या वतीने या वयोगटातील मुली व त्यांच्या मातांच्या वैद्यकीय मार्गदर्शनाखातर लातूर येथील विवेकानंद रुग्णालय / गॅलॅक्सी रुग्णालय येथे कार्यरत असलेल्या स्त्री रोग व प्रसुतिशास्त्र तज्ज्ञ मा. डॉ. सौ. अमृता पाटील, यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या व्याख्यानाचा लाभ अधिकाधिक विद्यार्थिनी व त्यांच्या माता यांना घेता यावा, यासाठी पानगाव (ता. रेणापूर जि. लातूर) येथील विद्यालयातील विद्यार्थिनींना, त्यांच्या माता / ज्येष्ठ भगिनी यांच्यासह विद्यालयातील महिला / शिक्षिका यांनाही कार्यक्रमास येण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे, ग्रामीण भागात मुलांचे मानसिक आरोग्य दुर्लक्षित राहते. विद्यार्थ्यांच्या किशोरवयीन अवस्थेत अनेक भावनिक समस्या परीक्षा वा शैक्षणिक वाटचालीतील नैराश्य, संगत, आकर्षणे व प्रलोभने, संकोच, निष्णात मार्गदर्शनाचा अभाव, अजाणता यांमुळे अजून गंभीर होतात. व्यसनाधीनताही जडते. कुटुंबातही असलेले अज्ञान व वातावरण यांमुळे या वयातील मुलांची कुचंबणा होते. ती योग्य मार्गदर्शनाने रोखली गेली, तर त्यांच्या सर्वांगीण विकासातील अडथळे दूर होवू शकतात.

या जाणिवेतून या वयोगटातील मुले व पालकांच्या मार्गदर्शनाखातर मानसोपचार तज्ज्ञ (सावली मानसोपचार केंद्र, लातूर) , मा. डॉ. श्री. मिलिंद पोतदार यांचाही व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना मास्क्सचे मोफत वितरणही करण्यात आले. आरोग्यविषयक निर्देशांचे पालन करून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पानगावच्या सरस्वती विद्यालय तसेच तिरुपती विद्यालयांतील विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासाठी हा दुहेरी कार्यक्रम पर्वणी ठरला. याप्रसंगी, सावली मानसोपचार केंद्राच्या उद्बोधक फलकचित्रांचे दालन उभे करण्यात आले होते. राहुल लोंढे व ज्ञानेश्वर तुगावे यांनी शास्त्रीय माहिती विद्यार्थ्यांना दिली.




एकाचवेळी वेगवेगळया दालनात व प्रांगणात समांतर संपन्न झालेल्या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी मा. किसनरावजी भंडारे (अध्यक्ष, मानव विकास संस्था व पन्नगेश्वर सह. साखर कारखाना, पानगाव) व सौ. प्रणिता भंडारे (ग्रा.पं. सदस्या व सहशिक्षिका, पानगाव) होते. मुलांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. डोंगरे व मुलींच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नाबदे यांनी केले. आभारप्रदर्शन श्री. वैजनाथ चामले यांनी व सौ. सुलोचना माले यांनी केले. या कार्यक्रमास प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी व कोषाध्यक्ष श्री. दत्ता कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी, प्रतिष्ठानचे सहसचिव पुरुषोत्तम भांगे, मुरलीधर डोणे, व्यंकटराव अनामे, मुख्याध्यापक श्री. धनराज चेगे व प्रतिष्ठित नागरिक आणि पालकांची विशेष उपस्थिती होती. या दुहेरी कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी श्री. बालासाहेब यादव, प्रा. मनोहर कबाडे, डॉ. अशोक आरदवाड, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. अनघा राजपूत, अनिल फुलारी यांशिवाय सरस्वती विद्यालय व तिरुपती विद्यालयांतील शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.






## सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानचा तृतीय वर्धापनदिनी विद्यार्थ्यांचे वैद्यकीय मार्गदर्शन

ग्रामीण भागात किशोरवयीन विद्यार्थिनींच्या समस्या संकोच, निष्णात मार्गदर्शनाचा अभाव, अजाणता, भीती यांमुळे अजून गंभीर होतात. शिक्षण व अभ्यास यांवरही परिणाम होतो. त्याचप्रमाणे, मुलांचेही मानसिक आरोग्य दुर्लक्षित राहते. किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या भावनिक समस्या परीक्षा वा शैक्षणिक वाटचालीतील नैराश्य, संगत, आकर्षणे व प्रलोभने, संकोच, निष्णात मार्गदर्शनाचा अभाव, अजाणता यांमुळे गंभीर होतात. व्यसनाधीनताही जडते. कुटुंबातही असलेले अज्ञान व वातावरण यांमुळे या वयातील मुलांची कुचंबणा होते. ती योग्य मार्गदर्शनाने रोखली गेली, तर त्यांच्या सर्वांगीण विकासातील अडथळे दूर होवू शकतात.

या जाणिवेतून तृतीय वर्धापन दिनानिमित्त या वयोगटातील मुलामुलींसह त्यांच्या माता व पालकांच्या वैद्यकीय मार्गदर्शनाखातर लातूर येथील विवेकानंद रुग्णालय / गॅलॅक्सी रुग्णालय येथे कार्यरत असलेल्या स्त्री रोग व प्रसुतिशास्त्र तज्ज्ञ मा. डॉ. सौ. अमृता पाटील व मानसोपचार तज्ज्ञ (सावली मानसोपचार केंद्र, लातूर), मा. डॉ. श्री. मिलिंद पोतदार यांच्या व्याख्यानाचा



कार्यक्रम एकाचवेळी वेगवेगळया दालनात व प्रांगणात समांतर आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना मास्क्सचे मोफत वितरणही करण्यात आले. आरोग्यविषयक निर्देशांचे पालन करून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पानगावच्या सरस्वती विद्यालय तसेच तिरुपती विद्यालयांतील विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासाठी हा दुहेरी कार्यक्रम पर्वणी ठरला. याप्रसंगी, सावली मानसोपचार केंद्राच्या उद्बोधक फलकचित्रांचे दालन उभे करण्यात आले होते. राहुल लोंढे व ज्ञानेश्वर तुगावे यांनी शास्त्रीय माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी मा. किसनरावजी भंडारे (अध्यक्ष, मानव विकास संस्था व पन्नगेश्वर सह. साखर कारखाना, पानगाव) व सौ. प्रणिता भंडारे (ग्रा.पं. सदस्या व सहशिक्षिका, पानगाव) होते. मुलांच्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. प्रल्हाद डोंगरे व मुलींच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शशिकांत नाब्दे यांनी केले. आभारप्रदर्शन श्री. वैजनाथ चामले यांनी व सुलोचना माले यांनी केले. या कार्यक्रमास प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी व कोषाध्यक्ष श्री. दत्ता कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी, प्रतिष्ठानचे सहसचिव पुरुषोत्तम भांगे, मुरलीधर डोणे, व्यंकटराव अनामे, मुख्याध्यापक श्री. धनराज चेगे व प्रतिष्ठित नागरिक आणि पालकांची विशेष उपस्थिती होती. या दुहेरी कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी श्री. बालासाहेब यादव, प्रा. मनोहर कबाडे, डॉ. अशोक आरदवाड, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. अनघा राजपूत, अनिल फुलारी, संभाजी कुरे, शरद ठाकूर यांशिवाय सरस्वती विद्यालय व तिरुपती विद्यालयांतील शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.